Indian Streams Research Journal
International Recognized Multidisciplinary Research Journal
ISSN :2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume -8 | Issue - 2 | March- 2016

नागरी समाज आणि भारतीय लोकशाही

संगमेश्वर निला
सहाय्यक प्राध्यापकवालचंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स, सोलापूर

प्रस्तावना :-

'नागरी समाज' ही संज्ञा अनेक प्रकारच्या, भिन्न-भिन्न अशा सामाजिक संस्था, आंदोलने, मंडळे यांया संदर्भात वापरली जाते. इतकेच नव्हे तर एकूणच कुटुंबांच्या खाजगी क्षेत्रापासून ते राज्यसंस्थेपर्यंत जो सामाजिक, राजकीय अवकाश संस्था, संघटना, मंडळे, क्लब, कामगार संघटना, मंच व्यापतात तो सर्व अवकाश व त्यातील घटकांना नागरी समाज म्हणतात. साहजिकच प्रत्येक कालखंडात नागरी समाजाच्या घटकसंस्था बदलतात.

पाश्चात्य विचारवंतांच्या मते, व्यक्तींचे संपूर्णपणे खाजगी असणारे जग म्हणजे कुटुंब आणि संपूर्णतः राजकीय स्वरुपाची संस्था असणारे शासन याच्या अधल्या मधल्या सर्व सामुहिक संबंधांचा समावेश नागरी समाजात होतो. ग्राम्शीच्या मते, "नागरी समाज त्या-त्या

समाजातील सत्ताधारी वर्गाचे संबंध जोपासणारा, सरकारची तळी उचलणारा असतो." तर काहीजणांच्या मते, "नागरी समाज म्हणजे शोषित, मूक व्यक्तींचा, समूहांचा विद्रोही आवाज. नागरी समाज म्हणजे मुक्तीदायी लढ्यांची जागा." (बॉबीयो : २००१:८)

युरोपातील प्रबोधन पर्वानंतर आधुनिकतेच्या प्रकल्पाचा अंगभूत भाग म्हणून नागरी समाजाची संकल्पना पुढे आली. दुसरे म्हणजे, हा नागरी समाज उदारमतवादी लोकशाही समाजाच्या प्रारुपाशी जोडलेला होता.

नागरी समाजाचे स्वरुप व चरित्र हे वसाहतवादाच्या भारतातील विशिष्ट रुपाशी, इतिहासाशी निगडित असे राहिले. मुळातले विषम सामाजिक संबंध, तीव्र स्तरीकरण, सरंजामी मूल्यव्यवस्था, जातीय-वर्गीय-लिंगभावात्मक-वांशिकतेवर अधारित-धार्मिक भेद या पार्श्वभूमीवर उदारमतवादी लोकशाहीचे रोपण झाल्याने काही जुने भेद तीव्र झाले तर काही नवे भेदभाव निर्माण झाले.

❖ नागरी समाज या संकल्पनेचा इतिहास :-

सर्वच विचारवंत नागरी समाज ही संकल्पना युरोपीय प्रबोधनोत्तर परिदृष्टीचे फलित मानत असले तरी त्यातही मतमतांतर आहेत. काहींच्या मते तर हे त्याही पूर्वीच्या ग्रीक व रोमन तत्वज्ञानातून आले आहे.

हेगेलच्या नागरी समाजविषयक लिखाणात त्या काळच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय परिस्थितीचे प्रतिबिंब दिसते. मार्क्सच्या विश्लेषणात हेगेलच्या मांडणीविषयीची टीका आढळते. नागरी समाज म्हणजे प्रचलित भांडवली संबंधांचे दुसरे रुप. आर्थिक ध्येये साध्य करण्यासाठी नागरी समाजाचा वापर भांडवलदार करतात. (तांबे : २०११:१३)

हेगेलच्या विश्लेषणात नीतिशास्त्रीय अधिष्ठान असणाऱ्या माणसाला खाजगी आकांक्षासोबतच एक व्यापक, सार्वत्रिक कृतीत सहभागी होण्याची संधी या नव्या समुदायात मिळेल असे मानले जाते. तसेच अशी संधी आधुनिक राजसंस्था देतेच असे नाही.

मार्क्सने या विचारांचे खंडन केलेले दिसते. त्याच्या विश्लेषणात नागरी समाजात सर्व खऱ्या संघर्षाची घडणही होते व ते संघर्ष तेथे घडतात. त्यामुळे इतिहास नागरी समाजात रचला जातो. (तांबे २०११:१४)

ग्राम्शीच्या मते समाजातील विषमतांचे प्रतिबिंब नागरी समाजातही पडते व त्या सामाजिक-आर्थिक विषमतांचे पुनरुत्पादन नागरी समाज करतो. (बीबीयो : २००१:८)

❖ उदयाची कारणे :-

१९९० च्या दशकात जागतिक मंचावर 'नागरी समाज' या संज्ञेचे पुनरुज्जीवन झालेले दिसते. नागरी समाजाची संकल्पना दोन पातळ्यांवर पुढे आलेली दिसते. (१) नागरी समाज हा लोकशाही समाजाचा महत्वाचा गुणधर्म आहे. (२) दुसरा म्हणजे, नागरी समाजाचे कार्य हे लोकशाही ही नीट चालावी, यासाठी काळजी घेणे, लोकशाही अधिक लोकशाहीवादी बनवणे यासाठी काळजीपूर्वक प्रयत्न करणे हे आहे.

भारतासह अन्यत्रही नागरी समाज बळकट करण्याची भाषा वारंवार बोलली जाते. या प्रकारच्या सर्व चर्चांमध्ये उदारमतवादी लोकशाही राज्यपध्दती आदर्श आहे व त्या प्रकारच्या समाजात नागरी समाज लोकशाही बळकट करतो, हे अभिप्रेत असते. भारतामध्ये गावपातळीपासून शहरातील गल्यागल्यांमध्ये तरुण मंडळे, गणपती मंडळे, महिला मंडळे असतात. शहरांमध्ये पेन्शनर्स असोसिएशन, ज्येष्ठ नागरिक संघाचे जाळे दिसते. स्पोर्टस् क्लब, जिमखाने, आखाडे, वाचनालये चालवणाऱ्या धर्मादाय संस्था अनेक असतात. ही सारी सामुहिक संबंधाची जाळी 'नागरी समाज' या संज्ञेच्या व्याखेत चपखलपणे बसतात. त्याच बरोबर वर्गाधारित राजकीय भूमिका असणारे जातीयवादी व जातीअंताचे राजकारण करणारे गट/संघटना व उजव्या धार्मिक व्यासपीठांची भेळ म्हणजे नागरी समाज !

❖ नागरी समाज :-

कुटुंबसंस्था व राज्यसंस्था या दोहोंमधील सामाजिक अवस्थेसाठी हेगेलने नागरी समाज ही संज्ञा वापरली आहे (व्होरा: १९८६:१३०). ग्राम्शीने अशी भूमिका मांडली की, आर्थिक अरिष्टामुळे केवळ नव्या विचारांना उपयुक्त असे वातावरण निर्माण होते. म्हणजेच भांडवलशाहीच्या आर्थिक पेचप्रसंगाला प्रतिसाद देणारे, भांडवलदारी विचारांना आव्हान देणारे क्रांतीकारक विचार मांडले गेले पाहिजेत. हे विचार म्हणजेच कामगार वर्गाची क्रांतिकारक भूमिका अधिकाधिक वर्गांना मान्य व्हायला हवी. याचाच अर्थ कामगार वर्गाने भांडवलदार वर्ग

आणि त्याला साथ देणारे वर्ग यांच्या विरोधात विविध वर्गांची एकजूट केली पाहिजे. यातून नवी क्रांतीप्रवन शक्तींची युक्ती (Historic Bloc) तयार होईल व त्यांच्या वैचारिक प्रभुत्वाचे क्षेत्र वाढत जाईल. (व्होरा:१९८६:३०५)

❖ नागरी समाजाचं मायावी स्वरुप :-

इंग्रजी दैनिकात मार्केटिंगचं काम निपुणपणे करणाऱ्या काही जणांनी नव्वदीच्या दशकामध्ये 'पीपल लाईक अस' आपल्यासारखेच लोक 'अलोक' हा शब्द स्विकारला. खरं तर हा शब्द तोपर्यंत सातत्याने भेदभावाला सामोरे जाणारे आणि अल्पसंख्य असलेले समकामी गट समकामी लोकांसाठी वापरत होते (पी साईनाथ : २०११:९). फेब्रुवारी २०११ दिल्लीमध्ये कामगारांचा एक विराट मोर्चा निघाला. आपलेच जगण्याचे प्रश्न घेऊन हे सगळे कामगार रस्त्यावर आले होते. खरं तर नागरी समाजाचं रुप यापेक्षा वेगळ काही असूच शकत नाही. पण जागतिक वृत्तसंस्था सोडल्या तर भारतीय प्रसारमाध्यमांनी या महामोर्च्याकडे महादुर्लक्ष केले.

भारतात नागरी समाज हा वेगवेगळ्या वगळगुणुकीच्या आधारावर तयार होत असल्याचे दिसते. या नागरी समाजात मानवाधिकार वकील आणि कार्येकर्ते, स्वयंसेवी संस्थाचे चालक, बुध्दीजीवी आणि विचारवंत, तसेच उच्चस्तरीय पत्रकार, बॉलिवूडमधील चमकते सितारे आणि वाहिन्यांवरील चर्चासाठी बोलवले जाणारे तज्ञ यांची भरणा आहे. भूमीहीन शेतमजूर, विस्थापित झालेले लोक, रुग्णसेविका, कामगार संघटनांचे कार्यकर्ते, बसवाहक, चालक कधीच नागरी समाजाचे चेहरा (मुखवटा) म्हणून प्रसारमाध्यमातील चर्चांमध्ये बोलवले जात नाहीत.

शासनाला सल्ला देणारे गट समाजामध्ये असण्यात काहीच चूक नाही. तसंच सरकारने त्यांचे ऐकण्यात आणि लोकांचे सल्ले घेण्यात, विशेषत: ज्या लोकांवर त्या निर्णयांचा परिणाम होणार असतो. त्या लोकांचे सल्ले घेण्यात काहीच अयोग्य नाही. पण जेव्हा घटनात्मक मार्गाने निर्माण न झालेले गट जेव्हा आपल्या मागण्यांसंदर्भात अतिरेकी वर्तन करु लागतात तेव्हा प्रश्न निर्माण होतात. मग त्यांचे हेतू कितीही चांगले का असेना शासनाला सुयोग्य, सुसंघटित विचार सुचवणं ही चांगलीच गोष्ट आहे. तसंच सरकारनं त्याचं काम योग्य तऱ्हेने करावं असं म्हणणंदेखील योग्यच आहे. पण याच्यापुढे मात्र पेचच पेच असतात.

❖ नागरी समाज आणि लोकशाही :-

नागरी समाज या संकल्पनेची वैचारीक नाळ ही जरी हेगेल, मार्क्स-एंग्लस् आणि ग्राम्शी यांच्या लेखनाशी जोडलेली असली तरी आज मात्र त्याचा अर्थ आर्थिक क्षेत्रात खुल्या बाजारपेठचा आणि राजकीय क्षेत्रात लोकशाहीचा पाठपुरावा करणाऱ्या काही विशिष्ट संस्था आणि रीतीचा समुच्चय असा केला जातो. नागरी समाजावरील अलीकडच्या चर्चावर एकंदरच उदारमतवादी वैचारिक परंपरेचा पगडा दिसतो आणि तो प्रभाव निश्चितच स्पर्धात्मक बाजारपेठेतून आलेला नाही हे ध्यानात घेतले पाहिजे (धनागरे : २००५:१२८).

व्यक्ती कुठल्याही जाती, वंश, वर्ण किंवा संस्कृतीतील असोत, त्या सर्वांना आपल्या स्वत्वाचा विकास आपल्या इच्छेनुसार करण्याची समान संधी उपलब्ध करुन देणे हे नागरी समाजाचे एक (सकारात्मक) व्यवच्छेदक कार्य आहे. भिन्न मतांबद्दल आदर बाळगला जातो. विरोध सहन केला जातो. एवढेच नव्हे तर काही प्रमाणात विरोध प्रकटीकरणाला प्रोत्साहनही दिले जाते.

❖ निष्कर्ष :-

भांडवलदारी अर्थरचनेमुळे फक्त नागरी वृत्ती (Civility) च नव्हे, तर विशिष्ट सभ्यतांचे (Civilizational) अस्तित्व, त्यांची अस्मिताही धोक्यात येते. त्याचा चेहरामोहराच सांस्कृतिक इतिहासातून पुसला जाण्याची भिती निर्माण होते. म्हणूनच जागतिकीकरणाच्या ह्या पार्श्वभूमीवर 'स्वायत्त नागरी समाज, राज्यसंस्था आणि लोकशाही' या विषयाच्या चर्चाविश्वाचे आज जोमाने पुनरुज्जीवन का होतोय ते कळू लागते. नागरी समाज ही आजमितीला म्हणून वैचारिक टोक हरवलेल्या निसरड्या वाटेवरची सोईस्कर अशी मोट आहे. नव्याने प्रचलित होणाऱ्या सर्व सरकारी धोरणात सी.ए.ओ. (सिव्हिल सोसायटी ऑर्गनायझेशन) ची परिभाषा वारंवार स्टॉकहोल्डर्ससह येते. अशा संदिग्ध निसरड्या संकल्पनेचा विचार न करता वारंवार वापर करणे हे धोकादायक आहे. एका अर्थाने राजकीय क्षेत्राची राजकीयता नष्ट करण्यासाठी नागरी समाजाचे एक निरागस लोकशाहीवादी तथाकथित रुप उदारमतवादी लोकशाही मांडते आहे. गव्हर्नमंटऐवजी गव्हर्नन्सची चर्चा-नियम नियंत्रण शासकीयतेतले शिष्टाचार अशी आशयापेक्षा तंत्र महत्वाचे स्वरुपाची चर्चा शासकीय-बिगरशासकीय-राजकीय-अराजकीय

व्यासपीठावरुन रंगते आहे. दुसरे आपापल्या परिदृष्टीनुसार संघर्ष, लढाई, आंदोलन या संज्ञा नव्या जागतिक फॅशननुसार कचऱ्यात टाकणे थांबायला हवे. म्हणजेच नागरी समाजाच्या संकल्पनेची पूनर्व्याख्या केल्याशिवाय ती वापरता येत नाही.

शासकीय पातळीवरील नागरी समाजाचे गौरवीकरण तर दुसरीकडे राज्यसंस्था व बाजारप्रणित अर्थव्यवस्थेची हुकुमशाही रोखण्याची गरज अशा परिस्थितीत या संकल्पनेची जहाल व्याख्या पुन्हा पुढे यायला हवी.

नागरी समाज हा लोकशाही व्यवस्थेतील नियमनात्मक गाभा टिकवणारा घटक आहे. समता, न्याय आणि स्वातंत्र्य यांच्या रक्षणासाठी, दृढीकरणासाठी संघर्ष छेडणारा नागरी समाज ही बाजू वारंवार अधोरेखित करावी लागेल. मग व्यावहारीक पातळीवर नागरी समाजाचे बारकाईने विश्लेषण आवश्यक आहे. कोणत्या संघटना, कोणती विचारप्रणाली, अराजकीय की राजकीय, कोण कशासाठी, का एकत्र येत आहे याचे आर्थिक, राजकीय, सामाजिक गणित मांडल्याशिवाय नागरी समाज हा शिक्का मांडता येणार नाही. अन्यथा उदारमतवादी, लोकशाहीच्या व नव उदारमतवादी भांडवलशाहीच्या पथ्यावर पडणार आहे.

कुठल्या राज्ययंत्रणेच्या दबावाखाली किंवा कोणता लाभ मिळविण्यासाठी नाही, तर स्वयंप्रेरणेने, सर्वांच्या हितहिताचा विचार बाळगून सद्वर्तन करणाऱ्या व्यक्ती हा लोकशाहीच्या अत्यंत प्राणभूत आधारस्तंभांपैकी एक असतो आणि अशा निःस्पृह, स्वातंत्र्यप्रेमी व्यक्तींच्या खांद्यावर लोकशाही उभी असेल तरच खऱ्या अर्थाने स्वायत्त नागरी समाज जिवंत राहतो अशी लोकशाही व्यवस्था असणे ही नागरी समाजाच्या सुस्थितीची पूर्वअट आहे.

❖ संदर्भ :-

- तांबे श्रृती (२०११), 'नागरी समाजाच्या पुनर्व्याख्येची गरज'परिवर्तनाचा वाटसरु, पृ. १३
- पी साईनाथ (२०११), 'नागरी समाजाचं मायावी स्वरुप', परिवर्तनाचा वाटसरु, पृ. ९
- धनागरे द. ता. (२००५), संकल्पनाचे विश्व आणि सामाजिक वास्तव, पारगावकर, पुणे, पृ. १२८
- व्होरा राजेंद्र व सुहास पळशीकर (१९८६), राज्यशास्त्र कोष, रामचंद्र दास्ताने, पुणे, पृ. १३०
- Norberto Bobbio (2001) Gramsi and the concept of civil society in keanc (ed) civil society and the state : New European perspectives verso, P. 8

संगमेश्वर निला

सहाय्यक प्राध्यापकवालचंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स, सोलापूर